# दीपस्तंभ यशोत्सव २०१४

## सविस्तर अहवाल

दीपस्तंभ फाऊंडेशनतर्फे 'यशोत्सव' कार्यक्रमाचे आयोजन रिंग रोड वरील जे.डी.सी.सी. बँकेच्या सभागृहात मंगळवारी सकाळी 10 वाजता करण्यात आले होते. याप्रसंगी युपीएससी, एमपीएससी व इतर शासकीय परीक्षातून विविध पदांवर नियुक्त झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी मंचावर आंतरराष्ट्रीय स्तरावरील सामाजिक कार्यकर्ते डॉ. जगन्नाथ वाणी, जिल्हा पोलीस अधिक्षक एस. जयकुमार, खासदार रक्षा खडसे , माजी आमदार पी.डी.दलाल, माजी शिक्षक आमदार जे.यू. ठाकरे, केशव स्मृती प्रतिष्ठानचे भरत अमळकर, शिक्षण तज्ञ प्राचार्य निळकंठ गायकवाड व प्रा. सुरेश पांडे होते.

### ▶ मान्यवरांचे मार्गदर्शन व यशस्वीतांचे अनुभव कथन :

1) **डॉ. जगन्नाथ वाणी :**

कोणत्याही क्षेत्रात जा, परंतु समाजाचे ऋण फेडा आणि समाजसेवेसाठी जीवन समर्पित करा. प्रत्येक व्यक्ती समाजाचे देणे लागतो. समाजातील प्रत्येक घटकांच्या विकासासाठी सामूहिक प्रयत्न केले पाहिजेत.

2) **एस. जयकुमार** (S.P) :

आपण यशासाठी उत्तम नियोजन करतो पण अंमलबजावणीमध्ये कमी पडतो. कोणतेही कार्य करतांना उत्तमाचा ध्यास घ्या. कोणत्याही टप्प्यावर अपयश आले तर निराश होवू नका. शिस्त बध्द, प्रामाणिक मेहनत केल्यास यश नक्की मिळते. आज देशात प्रामाणिक प्रशासनाची गरज आहे. आत्मविश्वासाचा अभाव व अति आत्मविश्वास ह्या दोन्ही गोष्टी तुम्हाला यशापासून दूर नेतात. समतोल मनाने प्रयत्न केले पाहिजेत असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. ग्रामीण भागासाठी दीपस्तंभ करत असलेल्या कामाबद्दल दीपस्तंभ टीमचे त्यांनी अभिनंदन केले.

3) **खासदार रक्षा खडसे :**

युवकांना संबोधित करतांना खा. रक्षा खडसे म्हणाल्या की, तुम्ही जसा स्पर्धा परीक्षांसाठी संघर्ष करीत आहात तशी मी पण राजकारणाच्या करिअरमध्ये संघर्ष करीत आहे. राजकारणाद्वारे समाजाची सेवा करता येते असा आदर्श मला निर्माण करायचा आहे. आज देशाला हजारो सृजनशील तरुणांची गरज आहे. दिल्लीमध्ये काम करतांना भाषेची अडचण येते. त्यासाठी याकाळातच इंग्रजी व हिंदी भाषेवर मेहनत घ्या. पुढे त्या म्हणाल्या की, तुम्ही भाग्यवान आहात, सुरुवाती पासूनच तुम्हाला दीपस्तंभसारखी मूल्य व गुणवत्ता जोपासणारी संस्था मार्गदर्शक म्हणून लाभली.

4) **मयूर पाटील** (IPS) :

मला बारावीला सत्तावन्न टक्के मिळाले. इंजिनिअरींग करतांना दोन वेळा नापास झालो. परंतु बी. ई. करत असतांनाच युपीएससी करण्याचे ध्येय ठरवले. मग मात्र विचलीत न होता, अपयशाने खचून न जाता युपीएससी परीक्षा देत राहिलो व त्यातूनच हे यश मिळाले. स्पर्धा परीक्षांची तयारी करतांना सातत्य आणि संयम आवश्यक आहे.

5) **प्रविण चव्हाण** (IRS) :

चिखलातून पायी शाळेत जाणारा शिक्षक ते आय.आर. एस. असा माझा प्रवास आहे. आज मी 8 व्यांदा स्पर्धा परीक्षा यशस्वी झालोय. युपीएससी करतांना परीक्षा कुठल्याही भाषेतून देणार असलात तरी हिंदी व इंग्रजी दोन्ही भाषांवर प्रभुत्व मिळवा. आपल्या मुलाला यश मिळाल्यानंतर आई – वडीलांच्या डोळयातील आनंदाश्रू जगात सर्वात मौल्यवान गोष्ट आहे. यासाठी तरी उत्तुंग यश मिळवा.

6) **राहुल गरुड** (Asst. Commandant) :

जीवनात एकदा ठरविलेले ध्येय कधीही सोडू नका. आपले ध्येय गाठण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक असते. सातत्यपूर्ण प्रयत्न व मेहनतीने आपण यश संपादन करु शकतो. अपयशाने खचून जाऊ नका. एक दिवस नक्की तुमचाच असतो.

7) **विनोद पाटील :**

माझ्या शारीरिक अपंगत्वावर हसणाऱ्या सर्व जगाला एक दिवस मीही अधिकारी होवून दाखवीन असा विश्वास जिद्दीने स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विकलांग विनोद पाटील याने यावेळी व्यक्त केला.

8) **योगिता दांडगे :**

मी अतिशय गरीब परिस्थितीतून आई– वडीलांच्या छत्राशिवाय लहान बहीण भावडांचा सांभाळ करुन 10 वी पास झाले. त्यानंतर माझे लग्न करुन देण्यात आले. तेथेही खूप त्रास सहन केल्यानंतर दोन मुलांसह पुन्हा भावाकडे आले. जिद्दीने फिजिओथेरपीचा कोर्स पूर्ण केला व प्रॅक्टीस करुन मुलांचे पालन पोषण करते. आता दीपस्तंभला शिष्यवृत्ती मिळाली आहे व येथे येवून स्पर्धापरीक्षांचा अभ्यास करते आहे. माझी CRPF मधे निवड झाली आहे. एक दिवस नक्की अधिकारी होवून या मंचावरुन सत्कार स्विकारेन असा विश्वास आहे असे प्रतिपादन योगिता दांडगे हीने केले.

9) **पंकज पाटील (शिष्यवृत्ती अभियान विद्यार्थी) :**

दीपस्तंभ शिष्यवृत्ती अभियानातून वर्षभर विनामुल्य निवास, भोजन व प्रशिक्षणासाठी माझी निवड झाली होती. याकाळात सर्व बाबी एकाच छताखाली मिळाल्यामुळे खूप चांगला अभ्यास झाला. दीपस्तंभचे खूप सहकार्य याकाळात मिळाले व माझी लिपिक पदावर निवड झाली. सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून माझ्यासारख्याच गरीब व होतकरु विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभ शिष्यवृत्ती योजनेला 11,000 रु ची देणगी देत आहे. असे प्रतिपादन पंकज पाटील यांनी केले.

10) **योगेश कोठावदे (शिष्यवृत्ती अभियान विद्यार्थी) :**

दीपस्तंभ शिष्यवृत्ती योजनेतून लाभ मिळून मी जसा शासकीय सेवेत गेलो तसाच तो लाभ इतरांना व्हावा म्हणून माझ्या पगारातील 5000/– रु ची देणगी मी शिष्यवृत्ती योजनेला देत आहे.

**याप्रसंगी राष्ट्रपती शौर्य पदक प्राप्त भामरागड येथील डी. वाय. एस. पी व दीपस्तंभचे विद्यार्थी अधिकारी विशाल ठाकूर यांच्या कुटुंबियांचा विशेष सन्मान करण्यात आला** व विशाल ठाकूर यांची चित्रफीत दाखविण्यात आली.दीपस्तंभ शिष्यवृत्ती प्राप्त गुरुकुलातील विविध पदांवर निवड झालेल्या विद्यार्थ्यांचेही कौतूक करण्यात आले. तसेच लिपिक, पोलीस व बँक या सर्व स्पर्धापरीक्षांतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सोबतच सहा. अभियंता, शिक्षण विस्तार अधिकारी, नेट, सेट, एम एस, एमएचसीईटी अशा विविध स्पर्धापरीक्षांमधील गुणवंतांचाही सत्कार करण्यात आला.

दीपस्तंभमध्ये आपल्या शारीरिक व्यंगावर मात करुन जिद्दीने अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचाही सत्कार यावेळी करण्यात आला.

दीपस्तंभ प्रकाशनाच्या जयदीप पाटील लिखित 'संपूर्ण विज्ञान' च्या तिसऱ्या आवृत्तीचे, दीपस्तंभ प्रकाशनाच्या 'करिअर डायरी' व 'करिअर आयकॉन्स' या पुस्तकांचे, राजेश पाटील लिखित 'माँ आय हॅव बीकम अ कलेक्टर' व संदीप साळुंखे लिखित 'अंतरीचा दिवा' या पुस्तकांचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते या कार्यक्रमात करण्यात आले.
कार्यक्रमाला 2400 विद्यार्थी पालक उपस्थित होते. ''अत्यंत प्रेरणादायी आयुष्याला वळण देणारा, संवेदनशीलता वाढविणारा, सत्कारात्मक दृष्टीकोन निर्माण करणारा कार्यक्रम'' असे वर्णन अनेकांनी केले.